# नवशिक्या मेंढपाळांना प्रशिक्षण देणाूयांसाठी मार्गदर्शकतत्वे

Download P-T studies freely from www.Paul-Timothy.net.

प्रशिक्षकाची प्रार्थना:

प्रिय प्रभू, नवीन मेंढपाळांना तू दिलेल्या मंडळीचे पुढारीपण करता यावे यासाठी त्यांना तुझ्या वचनातून मार्गदर्शन करण्यास आम्हांला साहाय्य कर. तुझ्या पवित्र आत्म्याच्या




सामर्थ्याने हे करण्यास आमची मदत कर. ही प्रार्थना आम्ही आमचा प्रभू आणि तारक येशू ख्रिस्त याच्या नावाने मागतो म्हणून ऐक, आमेन.

मार्गदर्शकतत्व 1: **नवीन मेंढपाळांना प्रशिक्षणाच्या तीन पद्धतींनी प्रशिक्षण द्या.**

आदर्श, मार्गदर्शन आणि वर्गातील शिकविणे यामध्ये समतोल असावा.


नवीन मेंढपाळांना अशा पद्धतीने प्रशिक्षण द्या की त्यांच्या मंडळ्या बहुगुणित होण्याची खात्री मिळेल, यासाठी प्रशिक्षणाच्या तीनही पद्धतीमध्ये निकोप समतोल राखा. येशू व प्रेषितांनी असेच केले.

पहिली पद्धत: मेंढपाळांसाठी आदर्श कौशल्ये



आठवड्यामध्ये नव्या पुढ्यायांसाठी देखभाल करण्याच्या कौशल्यांचे प्रात्यक्षिक दाखवा.

दुसरी पद्धत: लहान गटांना मार्गदर्शन करा



लहान गट करून एकत्र जमा, म्हणजे प्रत्येक प्रशिक्षणार्थीची मंडळी काय करीत आहे त्याचा अहवाल तुम्हांला ऐकता येईल. मग प्रत्येक मंडळीच्या गरजांसाठी देवाचे वचन लागू करा. पुढील आठवड्यात प्रशिक्षणार्थी व त्यांच्या मंडळ्या काय काम करणार याची योजना आखण्यास त्यांना मदत करा.

तिसरी पद्धत: मोठ्या गटांना व्याख्यान द्या.



मोठ्या गटांना वेळोवेळी चर्चासत्रे घेऊन शिक्षण द्या.

ह्या तीन पद्धतींपैकी प्रत्येक पद्धतीचे स्पष्टीकरण पाहू या.

पद्धत 1: जे उमेदवार आहेत अद्याप शिकत आहेत त्यांच्यासमोर देखभाल करणाऱ्यांची कौशल्ये आदर्श म्हणून ठेवा.

पाळकीय देखभाल आणि त्या कामाचे अन्य पैलू उमेदवारांना अद्याप माहीत नसतील तर त्यांना त्याचे प्रत्याक्षिक दाखवा. येशू व शिष्यांनीही शिकविताना, आरोग्य देताना मार्गदर्शन करताना त्यांच्या शिष्यांसमोर देखभालीच्या आदर्श तत्वांचे प्रत्यक्षिक ठेवले.

आठवड्यात काम करतानाही देखभाल करण्याच्या कौशल्यांचे प्रात्याक्षिक दाखवता येईल. त्यासाठी उपासनेची वेळच असली पाहिजे असे नाही. प्रशिक्षक स्वत:च्या मंडळीची देखभाल करताना कधी कधी प्रशिक्षणार्थी त्यांच्या बरोबर जाऊन प्रत्यक्ष काम पाहतील, केव्हा केव्हा प्रशिक्षक प्रशिक्षणार्थीच्या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन त्याच्या नवीन मंडळीच्या देखभालीमध्ये मदत करील.

पद्धत 2 : लहान गटांना स्थानिक ठिकाणी मार्गदर्शन करा.

प्रशिक्षणार्थीचे दोन ते पाच जणांचे लहान लहान गट तयार करा. गट लहान असावेत म्हणजे तुम्हांला प्रशिक्षकाला प्रत्येक प्रशिक्षणार्थीची मंडळी काय करीत आहे. त्याचा अहवाल ऐकता येईल तसेच प्रत्येक मंडळीतील विविध गरजा आणि संधी समजून घेता येतील. साधरणपणे एक किंवा दोन, फारतर तीन मंडळ्यांमधील प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शकांशी भेटता येते.

पद्धत 3: मोठ्या सभांमध्ये सर्व मंडळ्यांना लागू होतील अशी सर्वसाधारण सत्ये शिकवा.

शक्य असेल तेव्हा सर्व मेंढपाळांना लागू होतील अशा गोष्टी शिकविण्यासाठी मोठ्या भागातून मेंढपाळांच्या मोठ्या गटाला एकत्र करा.

## तुमच्या योजना लिहा

कृपा करून साहाय्यासाठी प्रार्थना करा. मग तीन प्रकारच्या शिकवणुकींचा समतोल साधणारी तुमची योजना लिहा. येशू व त्याच्या शिष्यांनी असाच समतोल साधला होता.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

मर्गदर्शक तत्व 2 **प्रशिक्षणार्थीच्या मंडळीत अभाव असणाया गोष्टी शिकविणारे अभ्यासक्रम निवडा**

तुमचे प्रशिक्षक वा समन्वयकांकडून पौल–तीमथ्य 'उपयोग करणाऱ्यांचा कार्यक्रम' मागून घ्या किंवा www. Paul-Timothy.net वरून Download करून घ्या त्यासाठी *'Download menu'* क्लिक करा. *'A printable version of Users' menu '* ह्याशिवाय तुमच्या आवडीचा *format* सिलेक्ट करा (वर दिलेल्या सूचना वाचा).

- प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थींनी लहान लहान गट करून अभ्यासक्रमांची निवड करण्यासाठी पौल तीमथ्य उपयोग करणाऱ्यांचा अभ्यासक्रम याचा उपयोग करावा.
- आता योग्य अभ्यासक्रम निवडायचा सराव करा. पुढे सेवाकार्ये आणि उदाहरणादाखल काही अभ्यास यांची यादी दिली आहे, ती पौल तीमथ्य उपयोग करणाऱ्यांचा अभ्यासक्रम यातून घेतली आहे. यापैकी कोणता कार्यक्रम तुमच्या मंडळीत नाही अथवा त्यात सुधारणा होण्याची आवश्यकता आहे त्यापुढील कंसात [ ] अशी खूण करा.

**सेवाकार्ये आणि नमुना अभ्यासक्रम** (उपयोग करणाऱ्यांच्या अभ्यासक्रमातून)

| **सेवाकार्ये** (नव्या करारानुसार आवश्यक असे सामुहिक कार्यक्रम) | **नवीन मेंढपाळांसाठी नमुना अभ्यासक्रम** (या यादीत प्रत्येक सेवाकार्यासाठी अनेक अभ्यासक्रमांतून फक्त एकच अभ्यास दिला आहे) |
|---|---|
| [ ] पी. टी एल. टी. चा परिचय | नव्या प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शकतत्वे *A0f* |
| [ ] खात्री मार्गदर्शन व भेटी घेणे | भय व लाज यावर मात करणे *A2a* |
| [ ] पवित्र शास्त्राचे सर्वेक्षण, अर्थ स्पष्टकरणे व लागूकरण | उत्पत्ती व कुलाधिपती *P2a* |
| [ ] मंडळी रोपण, गट बहुगुणीत करणे. | नवीन मंडळ्या व गट सुरू करणे. *C7a* |
| [ ] शिष्य करणे येशूचे आज्ञापालन करणे. | आमचा थोर राजा येशूच्या आज्ञा पाळणे. *F3a* |
| [ ] सुवार्ताप्रसार बाप्तिस्मा देणे, तारण | सामर्थ्याने येशूसाठी साक्ष द्या. *P5a* |
| [ ] दान देणे, कारभारीपण | बर्णबा, सढळ हस्ते दान देणारा *G1a* |
| [ ] ख्रिस्तामध्ये वाढ, पालट झालेला स्वभाव | पालट होणे व सात्विक स्वभाव *C1a* |
| [ ] अत्यंत महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना | ख्रिस्ती धर्माचा इतिहास, आरंभीची 400 वर्षे *H4a1* |
| [ ] प्रीती कौटुंबिक जीवन, इतरांची सेवा, सहभागिता | इतरांना साहाय्य करून दया, आस्था दाखविणे *L4a* |
| [ ] सेवाकार्य निरनिराळ्या संस्कृतींमध्ये काम करणे. | दुर्लक्षित लोकांकडे मिशनरी सेवक पाठवणे. *S2a* |
| [ ] संघटना व नेतृत्त्व करणे. | देवाने दिलेल्या आध्यात्मिक कृपादानांनी सेवा करणे. *S6a* |
| [ ] प्रार्थना विश्वास व आरोग्य देणे. | येशूच्या नावात आरोग्य देणे. *H2a* |
| [ ] पवित्र शास्त्रानुसार शिकविणे व गोष्टी सांगणे | मुलांना पवित्र शास्त्रानुसार शिक्षण द्या *T1a* |
| [ ] पुढायांना प्रशिक्षण द्या, मार्गदर्शन करा | येशू व पौल यांच्याप्रमाणे नवीन पुढायांना प्रशिक्षण द्या. *T3a* |
| [ ] उपासना प्रभुभोजन खास समारंभ | अहरोन व उपासनेचे नेतृत्त्व करणारे इतर पुढारी *W2a* |

विश्वासणायांच्या नव्या गटांमध्ये देखभाल करणाया वडिलांना उत्तम प्रशिक्षक प्रशिक्षण देऊन तयार करतो, प्रशिक्षणार्थींच्या लोकांच्या अद्याप अपुया राहिलेल्या गोष्टीची व्यवस्था करण्यास त्यांना प्रशिक्षक मदत करतात (तीत 1:5). मंडळ्यांमध्ये कोणत्या गोष्टींची उणीव आहे हे समजून घेण्यासाठी प्रथम तुमच्या प्रशिक्षणार्थींच्या मंडळीतील लोक काय करतात आणि अद्याप काय करीत नाहीत ते ऐकून घ्या.

**“आम्ही प्रशिक्षक ज्यांना प्रशिक्षण देतो त्यांचे प्रथम काळजीपूर्वक लक्ष देऊन ऐकतो.”**



- पौल तीमथ्य प्रशिक्षणात ‘एकमार्गी’ अभ्यासक्रम नसतो अशा ‘एकमार्गी’ अभ्यासात सर्व विद्यार्थी पहिल्या पाठा पासून सुरुवात करतात. मग दुसरा पाठ आणि असेच सरळ पुढे जातात त्याऐवजी सध्याच्या गरजांनुरूप विविध प्रकारच्या विषयांतून पर्याय तुम्ही निवडायचे असतात. येशू मत्तय 13:52 ह्या वचनात शिक्षकांना विविध माध्यमांचा उपयोग करण्याची कळकळीची विनंती करतो, “प्रत्येक शास्त्री जो स्वर्गाच्या राज्याचा शिष्य झाला आहे तो आपल्या भांडारातून नव्या जुन्या गोष्टी काढणाया गृहस्थासारखा आहे.”
- अभ्यासक्रमाच्या प्रत्येक संचात नव्या मेंढपाळांसाठी आणि मुलांसाठी एकाच विषयावरील अभ्यास दिलेला आहे.

## तुमच्या योजना लिहा

तुमच्या मंडळीची किंवा नव्या मंडळीची देखभाल करण्यासाठी तुम्हांला मदत करण्याकरिता तुम्ही कोणाला मार्गदर्शन, प्रशिक्षण देण्याची योजना आखली आहे?

________________________________________

तुमच्या उमेदवार प्रशिक्षणार्थींना त्याच्या स्वतःच्या कुटुंबियांची व त्यांनी ख्रिस्तासाठी जिंकलेल्या इतरांची देखभाल करण्यास सुरुवात करण्याकरिता कशी मदत कराल?

________________________________________

________________________________________


________________________________________

________________________________________

समजा कोणीतरी तुमचे मार्गदर्शन करीत आहे तर मग वर दिलेल्या सेवाकार्याच्या यादीतील कोणत्या गरजांपुढे तुम्ही खूण केली आहे ते त्यांना सांगा. मग ते तुम्हांला त्या बाबीना अनुरूप असे अभ्यासक्रम व प्रशिक्षणाची कौशल्ये आत्मसात करण्यास मदत करतील.

संबंधातील अभ्यासाचा तुम्ही निवडलेल्या सेवाकार्याचा क्रमांक काय आहे? (अभ्यासाच्या नावापुढे अभ्यासक्रमाचा क्रमांक दिला आहे.)


## मार्गदर्शकतत्वे 3: शास्त्रलेख देतात तेवढाच भर मार्गदर्शनावर द्या.



येशू व पौल हे प्रशिक्षण कसे द्यायचे याबाबतीत आमचे आदर्श आहेत. पुढ्यायांना प्रशिक्षण देण्यासाठी येशू व पौल ह्यांनी उपयोगात आणलेल्या मार्गदर्शतत्वांच्या वाटेनेच आम्ही चालतो नवीन मेंढपाळांनी महिन्यातून एकदा वा दोन वेळा मार्गदर्शकांना भेटावे. यावेळी त्यांचे म्हणणे मार्गदर्शक ऐकून घेतील. आणि मेंढपाळांच्या मंडळीच्या गरजाही त्यांना समजतील. मग ह्या गरजा हाताळण्यासाठी मार्गदर्शक त्यांना सुसज्ज करतील. मंडळी नवी असते तेव्हा प्रशिक्षणार्थीने वरचेवर मार्गदर्शकाची भेट घ्यावी.

- मार्गदर्शन हे प्रामुख्याने नव्या मेंढपाळांसाठी आहे, परिपक्व पुढारी एखाद्या विशेष बाबीवर समस्येवर तज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याची गरज असेल तरच, अन्यथा वरचेवर होणाया चर्चासत्रांना हजर राहून शिकत असतातच.
- सर्वसाधारणपणे, 2 तीमथ्य 2:2 मध्ये सांगितल्याप्रमाणे पुढारी त्यांनी किंवा त्यांच्या मंडळीने सुरू केलेल्या नव्या मंडळ्यांच्या मेंढपाळांना मार्गदर्शन करतात.
- मार्गदर्शन करणारी व्यक्ती वयस्कर अत्यंत अनुभवी पुढारी असलीच पाहिजे असे नाही. अशी व्यक्ती ती मार्गदर्शन करीत असलेल्या प्रशिक्षणार्थी पेक्षा महिनाभर ज्येष्ठ असली तरी हरकत नाही. याचा चांगला उपयोग होतो; कारण नवीन सेवकांच्या गरजांची मार्गदर्शकाला अगदी जवळून ओळख असते. त्याबद्दल कळकळ दाखवणे त्याला सोपे जाते, या बाबी संबंधात मार्गदर्शकाने मार्गदर्शनाच्या 'साखळीतील' अधिक अनुभवी मार्गदर्शकाचीही भेट घेतली पाहिजे.

पौल तीमथ्य अभ्यासक्रमांतून मार्गदर्शन घेणे सोपे आहे. नवशिक्या मेंढपाळांनाही नव्या मेंढपाळांना मार्गदर्शन करता येईल. यासाठी तुम्ही त्यांना नवीन मंडळ्यांच्या गरजा हाताळणारे साहित्य पुरविले पाहिजे. पौल-तीमथ्य अभ्यासक्रम यासारखी साधने उपयोगात आणा. तुमच्या प्रशिक्षणार्थीच्या मातृभाषेत त्यांचा अनुवाद करा. मार्गदर्शन हे सर्वसाधारणापणे तात्पुरते असते. नवीन विश्वासणायांसह नव्या मंडळ्यांचे नवे मेंढपाळ हे 'बालक मंडळीचे' 'बाल' पुढारी आहेत. नवजात बालकांच्या तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सातत्याने काळजी घ्यावी लागते. त्याप्रमाणे त्यांनाही नेहमीच कोणत्याना कोणत्या प्रकारच्या मार्गदर्शनाची गरज असते.



- नवीन पुढ्यायांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करण्यासाठी बराच वेळ लागतो. यासाठीच तुम्ही मोठ्या गटासाठी वेळोवेळी चर्चासत्रे आयोजित केली पाहिजेत. तीमथ्य व तीत ह्यांना वडिलांच्या मायेने मार्गदर्शन करण्यात पौलाने बराच वेळ खर्च केला. ते परिपक्व झाले आणि त्यांची वरचेवर काळजी करण्याची आवश्यकता उरली नाही तेव्हा पौल त्यांना सोडून इतरांना प्रशिक्षण देण्यास पुढे गेला.
- पौलाकडून मार्गदर्शन घेतल्यानंतर तीमथ्य व तीत ह्यांनी प्रशिक्षण देण्याची साखळी तशीच पुढे पुढ्यायांना दिले. नवजात बालकांकडे अधिक वैयक्तिक लक्ष देण्याची गरज असते. त्याप्रमाणे नवीन पुढारी व नवीन मंडळ्या नव्या करारात सांगितलेल्या गोष्टी करीत नाहीत तोपर्यंत त्यांना मार्गदर्शनाची गरज असते.

### तुमच्या योजना लिहा

तुम्ही कोणाला मार्गदर्शन करून सुरुवात कराल?

______________________________________________

तुम्ही केव्हा सुरुवात करात? ______________________________

# मार्गदर्शकतत्त्वे 4: स्वत: **उत्तरदायी असा आणि इतरांना उत्तरदायीत्व काय असते ते दाखवून द्या**

प्रभुच्या कार्याचा पुढारी इतर पुढ्यायांना जबाबदार असलाच पाहिजे. तुम्ही आणि इतर पुढ्यायांनी एकमेकांच्या सेवाकार्याचे परीक्षण करणे अगत्याचे आहे. यात इतरांवर नियंत्रण ठेवण्याची बाब नाही तर तुमच्या सेवाकार्याचा विकास होण्यास एकमेकांची मदत होणार आहे.

अशा प्रकारचे उत्तरदायीत्त्व सहभागींसाठी आनंदाचे असते. पण यासाठी त्यांचे एकमेकांवर प्रेम असले पाहिजे.

तुम्ही वेळोवेळी इतर पुढ्यायांची भेट घेऊन तुम्ही काय काम केले त्याचा अहवाल सादर करा. इतर पुढ्यायांनी तुमच्या कार्याचे मूल्यमापन केल्याशिवाय लोकांचे पुढारीपण करणे हे निष्काळजीपणाचे पाप ठरेल आणि ते नुकसानकारक असेल.

पौल आरंभी यरूशलेमेमधील इतर पुढ्यायांना जबाबदार होता (गलती 2:1-2).

पुढे पौल व बर्णबा त्यांच्या कार्याची माहिती अंत्युखियातील मंडळीला पाठवीत राहिले, याच मंडळीने त्यांना सेवेसाठी पाठविले होते (प्रे. कृ. 13:1-3 आणि 14:26-28).

तुम्ही आणि इतर पुढ्यायांनी परस्परांना बोध केला पाहिजे (कलस्सै 3:16) आणि आपल्या चुका एकमेकांजवळ कबूल करा (याकोब 5:16) तुम्ही इतर पुढ्यायांचा सल्ला मनापासून ऐकला पाहिजे; तसेच त्यांनी केलेली टीकाही ऐकून घेतली पाहिजे.

सर्व मेंढपाळांना अशा प्रकारच्या देखरेखीची आवश्यकता असते, यामुळे एकमेकांचे काम पवित्र शास्त्रानुसार आहे, याची पुढ्यायांना खात्री करून घेता येते. यामुळे तुमच्यातील नेतृत्वाची कौशल्ये वाढिला लागतील. तसेच लोकांवरील स्वार्थी, अनुचित वर्चस्वही तुम्ही ठेवणार नाही.

## तुमच्या योजना लिहा

तुम्हांला कोण मार्गदर्शन करणार?

________________________________________

प्रथम तुम्ही किती वेळा भेटणार?


________________________________________

तुम्हांला कोणी मार्गदर्शक नसेल तर पौल तीमथ्य अभ्यासाचा वापर करणाऱ्यांशी याबाबत बोला अशी व्यक्ती तुम्हांला मिळाली नाही तर मग मार्गदर्शन करण्याची साखळी स्वत: पासूनच सुरू करा, म्हणजे इतरांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात करा. पौलाने 2 तीमथ्य 2:2 मध्ये तीमथ्याला असेच करायला सांगितले आहे.

# मार्गदर्शकतत्व 5: **बहुगुणित होण्यासाठी पवित्र शास्त्रातील मार्गदर्शकतत्वाचे पालन करा**

येशूने सांगितल्याप्रमाणे प्रेषितांनी लोकांना शिष्य केले. तेथे तेथे मंडळ्या बहुगुणित झाल्या. मेंढपाळ येशूच्या आज्ञेनुसार आज्ञापालनाचा पाया घालतात तेव्हा आजही देव पूर्वीप्रमाणेच कार्य करतो. येशू व त्याच्या शिष्यांनी केले त्याप्रमाणे तुम्ही तुमच्या स्वत:च्या मंडळीला शिक्षण द्या आणि नवीन मंडळीच्या नव्या पुढ्यायांना प्रशिक्षण द्या. उदाहरणार्थ, पौलाने तीमथ्याला मार्गदर्शन केले मग त्याने योग्य अशा विश्वासू माणसांना प्रशिक्षण दिले. तसेच इतरांनाही शिकवले (2 तीमथ्य 2:2); यामुळे अनेक नवीन मंडळ्या तयार झाल्या.

येशू व त्याच्या शिष्यांनी नवीन पुढ्यायांना प्रामुख्याने मार्गदर्शन करून प्रशिक्षण दिले. मार्गदर्शनातून तुम्हांला जितक्या वेगाने नवीन मंडळ्या बहुगुणित होतात तितक्याच वेगाने नवीन पुढ्यायांना प्रशिक्षण देता येते, कारण प्रत्येक नवशिका मेंढपाळ त्याने वा त्याच्या मंडळीने सुरू करण्यास मदत केलेल्या मंडळ्यांच्या नव्या मेंढपाळांना प्रशिक्षण देतो.



नवीन मेंढपाळ अधिक अनुभवी मार्गदर्शक कशी देखभाल करतात त्याचा आदर्श समोर ठेवतात आणि तो आपल्या लोकांना देवाचे वचन कसे लागू करतो ते पाहून मग त्याचेच अनुकरण करतात (1 करिंथ 11:1)

येशूने ठामपणे सांगितले की त्याच्या राज्याची वाढ आणि विस्तार हा वृक्षासारखा आहे. आपण चांगल्या सुपीक जमीनीत बीज पेरले तर त्यातून 100 पट पीक मिळते (मार्क 4).

प्रत्येक प्रशिक्षणार्थी लवकरच इतर नव्या मेंढपाळांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात करील याची खात्री करून घ्या, जेणेकरून सर्वसाधारण मार्गाने मंडळ्यांची पुनरूत्पती होईल. प्रशिक्षण आणि सुवार्ताप्रसार ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होतात. कळकळीची प्रार्थना, सुवार्ताप्रसार आणि देवाचे साहाय्य यांच्या मदतीने तुम्हांला सेवक आणि त्याच्या नवीन मंडळ्या बहुगुणित करता येतील.



प्रतिसाद देणाया लोकांबरोबर काम करण्याचा प्रयत्न करा. जिथे लोक सुवार्तेचा स्वीकार करणार नाहीत तिथे 'तुमच्या पायाची धूळ झटका' आणि निघून जा अशी आज्ञा येशूने आपल्याला दिली. असे करायचे म्हणजे आपले राहते घर सोडून जायचे नाही तर देवाने तयार केलेल्या लोकांचा शोध घेण्याची प्रेरणा मिळते. साधारणपणे अत्यंत गरीब वर्गातील लोक सुवार्तेचा स्वीकार करण्यात अधिक पुढे असतात.

येशू व प्रेषितांनी मार्गदर्शन केले ती पद्धत सामर्थ्यशाली असून त्यामुळे मंडळ्यांना नवीन मंडळ्या तयार करण्यास मदत होते. येशूच्या शिष्यांना सत्याचा 'कार्यक्रम' (Package) दिला. तसेच पळायच्या रिले शर्यतीत धावक जसे सहजपणे बैटन एकमेकांना देतात तितक्या सहजपणे इतरांना शिकविता येतील अशा साध्या पद्धती दिल्या आहेत.

मार्गदर्शन आणि प्रशिक्षणार्थी यांच्यातील देखभाल करणाया नात्याचा देव उपयोग करून घेतो. मग यामुळे प्रभावी पुढ्यायांचा विकास आणि मंडळ्या बहुगुणित करण्याचे 'काम' (baton) दुसयाच्या हाती सोपविणे सोपे होते.

नवीन पुढ्यायांना लागलीच आणि सहजपणे अनुकरण करता येतील तसेच नवीन मेंढपाळांना प्रशिक्षण देता येईल अशा पद्धतीने उत्तम मार्गदर्शक त्यांना प्रशिक्षण देतात. तुम्ही तुमच्या प्रशिक्षणार्थींना शिकविता किंवा त्यांच्यासमोर आदर्श कौशल्ये सादर करता तेव्हा त्यांच्याकडे नसलेली साधने वापरून त्यांना शिकवू नका. शास्त्रलेखांमध्ये मार्गदर्शन करणायांची 'साखळी' आहे.

**इथ्रोने** मोशेला मार्गदर्शन केले.

**मोशेने** यहोशवा आणि इस्राएलाच्या वडीलजनांना मार्गदर्शन केले. देवाने नव्याने नेमणूक केलेल्या वडीलजनांना मार्गदर्शन केले. देवाने नव्याने नेमणूक केलेल्या वडीलजनांना मुख्यत्वेकरून दहा आज्ञा उपयोग करण्यासाठी दिल्या लोकांची देखभाल करण्याचे काम दहा दहाच्या लहान गटांमध्ये केले (निर्गम अध्याय 18-20).

**यहोशवाने** अनेक सैनिक पुढ्यायांना मार्गदर्शन केले.

**दबोराने** बराकाला मार्गदर्शन केले. परिणामी बराकाने देवासाठी मोठ्या सैनिकावर विजय मिळविला.

**एलीने** शमुवेलाला मार्गदर्शन केले.

**शमुवेलाने** शौल व दावीद ह्यांना मार्गदर्शन केले, ते पुढे इस्राएलाचे थोर राजे झाले.

**अहिथोफेल** व नाथान ह्या संदेष्ट्यांनीही दावीदाचे मार्गदर्शन केले

**दावीदाने** त्याच्या सैन्याचे सेनापती व सरकारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून एकत्रित इस्राएल राष्ट्र स्थापन केले.

**दावीदाने** आपल्या मुलाला शलमोनालाही मार्गदर्शन केले.

**शलमोनाने** शबाच्या राणीला मार्गदर्शन केले. तिने परत जाताना त्याच्या ज्ञानाने भरलेली नीतिसूत्रे बरोबर **घेतली.** ती देवाच्या नियमशास्त्रावर आधारलेली होती.

**एलीयाने** अलिशाला मार्गदर्शन केले.

**अलीशाने** योशीया राजा व इतरांना मार्गदर्शन केले.

**दानीएलने** नबुखद्‌दनेस्सर राजाला मार्गदर्शन केले. काही काळाने .राजा स्वत: देवासमोर नम्र झाला.

**मर्दखयाने** एस्तेरचे मार्गदर्शन केले.

**एस्तेरने** अर्तहशश्त राजाला मार्गदर्शन केले. यातूनच त्याने पुढे देवाच्या लोकांची सुटका केली.

**येशूने** आपल्या बारा शिष्यांना मार्गदर्शन केले. त्यांनीच आरंभीच्या ख्रिस्ती मंडळ्यांची सुरुवात केली.

**बारा शिष्यांनी** पौल आणि इतर शेकडो पुढ्यायांना मार्गदर्शन केले.

**पौलाने** तीत तीमथ्य आणि इतर अनेकांना मार्गदर्शन केले.

तीमथ्याने **एपफ्रास** आणि इतर विश्वासू माणसांनी "इतरांनाही" मार्गदर्शन केले (2 तीमथ्य 2:2) यातून प्रतिसादाची साखळी तयार झाली आणि आशियामध्ये डझनावारी नव्या मंडळ्या तयार झाल्या.

**फिलिप्पने** इथियोपियातील अधिकाऱ्याला मार्गदर्शन केले. त्या अधिकाऱ्याने ख्रिस्ताचा स्वीकार केला आणि वाळवंटात बाप्तिस्मा घेतला.

**प्रिस्किल्ला** व **अक्विल्ला** ह्यांनी अपुल्लोला मार्गदर्शन केले. यामुळे सेवाकार्य आणि नवीन मंडळ्यामध्ये सुधारणा झाली.

## तुमच्या योजना लिहा

वर्गामध्ये बसून शिक्षण देणे ही शिकविण्याची पारंपारिक पद्धत आहे ही पद्धत सोडली तर अन्य कोणत्याही वेगळ्या पद्धतीने तुम्ही शिकवले नसेल तर मग आता काही क्षण थांबून प्रभूकडे तुमचे साहाय्य करण्यासाठी विनंती करा.


तुमच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्याचा समावेश करण्यास वेळ वा क्षमता नसेल तर कृपा करून तुम्ही प्रभूला विनंती करा की हे काम तुम्ही कोणावर सोपवावे हे त्याने तुम्हांला दाखवावे. म्हणजे मग येशू व शिष्यांनी दाखविलेल्या मार्गाने तुमचे लोक पुढ्यायांना प्रशिक्षण देणे सुरू ठेवतील.

2 तीमथ्य 2:2 ह्या वचनानुसार एकच सेवक एकावेळी प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण घेईल आणि त्याच वेळी नवीन सेवकांना प्रशिक्षणामुळे तुमच्या लोकांना व नव्या लोकांना वेगाने नवीन पुढारी तयार करता येतील, यामुळे

ख्रिस्तासंबंधीची चळवळ व्यापक प्रमाणात सुरू करता येईल, तुम्ही प्रशिक्षण दिलेल्या प्रशिक्षणार्थींनी लवकरच इतरांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली पाहिजे. तुम्हांला माहीत असल्यास तुम्ही प्रशिक्षण देणाया सेवकांची नावे लिहा. आपण कोणाला शिकविणार हे तुम्हांला अद्याप ठाऊक नसेल तर कृपा करून माहीत करून घ्या.

मेंढपाळांना प्रशिक्षण देण्यात तुमचे साहाय्य करणाया इतर प्रशिक्षकांचीही नावे लिहा:

## मार्गदर्शकतत्व 6: **विवाहित पुढायांनी आपल्या पत्नी व मुलांची काळजी घेणे अगत्याचे आहे**



पौल इशारा देतो की आपल्या कुटुंबियांची देखभाल करण्यात अपयशी ठरलेल्या विश्वासणायाने विश्वास नाकारलेला असतो आणि असा माणूस विश्वास न ठेवणाया माणसापेक्षा वाईट आहे (1 तीमथ्य 5:8).

खराखुरा मेंढपाळ स्वत:च्या कुटुंबियांची काळजी घेऊन आपल्या पाळकीय सेवेचा आरंभ करतो.

कित्येक मंडळ्या आणि कुटुबियांना दु:खाचा सामना करावा लागतो कारण काही मेंढपाळ इतर लोकांसाठी जास्त वेळ खर्च करतात आणि आपल्या स्वत:च्या बायको मुलांकडे दुर्लक्ष करतात.

**तुमच्या योजना लिहा**

तुम्ही, तुमची पत्नी व मुलांसाठी योग्य तरतूद करणार याची खात्री होण्यासाठी तुम्ही काय खबरदारी घ्याल?

## मार्गदर्शक तत्व 7: **प्रशिक्षणार्थींना देवाच्या वचनातील 'सुवर्णकण' शोधण्याची संधी द्या.**



प्रत्येक मेंढपाळाने फक्त 'निष्क्रिय श्रोता' किंवा नुसते पुढारी होण्यापेक्षा सक्रिय विद्यार्थी व्हावे यासाठी त्यांना मदत करा. प्रत्येकाने आपल्या लोकांच्या गरजा काय आहेत ते सत्य स्वत: शोधून काढले पाहिजे. इतर लोक येऊन आपल्याला सर्व तपशील सांगतील याची त्याने वाट पाहू नये.

विद्यार्थ्याला स्वत: काय शिकता येईल ते शिकवू नका, त्याना प्रश्न विचारा. त्यामुळे त्यांनी व त्यांच्या लोकांनी काय करावे अशी देवाची इच्छा आहे त्याबद्दल विचार करण्यास चालना मिळेल. पौल-तीमथ्य अभ्यास काही गोष्टी पवित्र शास्त्रातून शोधून काढण्यास त्यांना सुचवितो.

## मार्गदर्शकतत्त्व 8: **मार्गदर्शनाच्या सत्रांमध्ये पाच गाष्टी करा या पाच**

महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे प्रार्थना, ऐकणे, नियोजन, उजळणी, काम नेमणे होय.

**1) प्रशिक्षण सत्राच्या पूर्वी, मध्ये आणि नंतर प्रार्थना करा.**

सत्राच्या आरंभी उपस्थित असणाया प्रत्येकाला प्रभूने मार्गदर्शन करावे अशी विनंती करा.

सत्राच्या दरम्यान प्रश्न निर्णय वा समस्या तुम्ही हाताळाल तेव्हा प्रार्थना करा कारण यासाठी तुम्हांला विशेष सामर्थ्य किंवा सूज्ञतेची आवश्यकता असते.

सत्राच्या अखेरीस तुम्ही आखलेल्या योजनेनुसार काम करण्यास तुम्हांला व तुमच्या लोकांना प्रभूने सामर्थ्य द्यावे यासाठी विनंती करा.

**2) प्रत्येक प्रशिक्षणार्थीचे ऐका. प्रत्येकाला तो व त्याचे लोक काय करत आहेत ते सांगण्याची संधी द्या.**

नवीन मेंढपाळांना त्यांचे यश आणि अपयश अशा दोन्ही गोष्टींचे अहवाल देण्याची विनंती करा.

त्याचा अहवाल आणि त्या आधीच्या सत्रात त्याने केलेली योजना ह्यांची तुलना करा.

**3) प्रत्येकाच्या क्षेत्रिय कामाची योजना आखा**

प्रत्येक प्रशिक्षणार्थी आणि त्याचे लोक पुढील आठवड्यात किंवा महिन्यात काय करणार त्याबद्दल योजना आखण्यास त्याला मदत करा.

प्रशिक्षणार्थी आपल्या लोकांसमवेत करणार असलेले कार्यक्रम लिहून घ्या.

पुन्हा पुन्हा योणाया प्रश्नांवर वेळ वाया घालविणे टाळा. नेहमी नवनवीन योजना आखा.

सैतानाने निर्माण केलेल्या समस्यांना नुसता प्रतिसाद देऊन 'त्याच्याबरोबर नाचू नका' लोक अद्याप करीत नसलेले कार्यक्रम करण्यात पुढाकार घ्या किंवा त्यांच्या अद्याप अपुया असलेल्या कामांना बळकटी द्या. सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करून मंडळी उभारण्यास साहाय्य करा.



**"माझ्या तालावर नुसते नाचत राहा!"**

प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी अशा दोघांनीही ह्या योजनांची एक यादी आपल्याकडे ठेवून पुढच्या सत्राच्या वेळी त्या पडताळून पाहा

**4) मागील मार्गदर्शन सत्रात सोपवलेल्या कामाची उजळणी करा.**

प्रशिक्षणार्थीला त्याच्या वाचनातून काय शिकायला मिळाले ते विचारा त्याबद्दल त्याला बोलू द्या.

त्याने अभ्यासाचे साहित्य नीट वाचले नसल्यास त्याला ते पुन्हा परत वाचण्यास सांगा. सध्या हातात असलेल्या गोष्टींचा नीट अभ्यास झाल्याशिवाय त्याला पुढचा अभ्यास करायला देऊ नका.

विद्यार्थ्याला त्याने काय अभ्यास केला त्याविषयी बोलण्याची संधी द्या.

**5) सध्याच्या गरजा आणि सेवेच्या संधी यानुसार अभ्यासक्रम द्या.**

सर्व प्रशिक्षणार्थींना एकच अभ्यास करायला देऊ नका. प्रत्येक प्रशिक्षणार्थीच्या मंडळीच्या गरजा आणि सेवेच्या संधी यानुसार त्याला अभ्यास द्या.

अगदी नव्या विद्यार्थ्यांना एका वेळी एकच अभ्यास नेमून द्या. आता तुम्हांला त्यांना वरचेवर भेटणे शक्य नसेल तर गोष्ट वेगळी आहे.

पौल तीमथ्य उपयोग करणाऱ्यांच्या कार्यक्रमाचा (मार्गदर्शक तत्व 2) उपयोग करा.

## तुमच्या योजना लिहा

वर दिलेल्या पाच गोष्टी तुम्ही तुमच्या प्रशिक्षणार्थींच्या बरोबरच्या अभ्यास सत्रात कराल, त्या कृपा करून पाठ करा आणि आठवून येथे लिहा:

1. ________________________________________

2. ________________________________________

3. ________________________________________

4. ________________________________________

5. ________________________________________

तुम्ही तुमच्या प्रशिक्षणार्थींसाठी पौल तीमथ्य अभ्यासक्रम कसा मिळवाल?

________________________________________________________

________________________________________________________

________________________________________________________


________________________________________________________

# मार्गदर्शकतत्व ९: तत्काळ आचरणात आणता येईल अशा प्रकारे पौल तीमथ्य अभ्यासक्रमांचा उपयोग करा

नवीन पुढ्यायांसाठीच्या प्रत्येक पौल तीमथ्य अभ्यासामध्ये तीन भाग आहेत

1. पवित्र शास्त्राच्या अभ्यासाद्वारे स्वत:ची तयारी करा.
2. आगामी आठवड्यातील कार्यक्रमांची योजना आखा.
3. आगामी उपासना सभेची योजना आखा.

## १) पवित्र शास्त्राच्या अभ्यासाद्वारे स्वत:ची तयारी करा.



तुम्ही काय आणि कसे काम करणार त्यासाठी तुमचा मार्गदर्शक म्हणून शास्त्रलेखांचा उपयोग करा.


शिकविणे, सुवार्ताप्रसार करणे, संघटन आणि उपासना सभा चालविणे हे कसे करायचे, याकरिता मार्गदर्शक म्हणून देवाच्या वचनाचा उपयोग करा, ते केवळ तुमच्या शिक्षणाचे एक साधन आहे असे समजू नका.

प्रत्येक अभ्यासक्रमात देवाच्या वचनातून शोधण्यासाठी काही गोष्टीची यादी दिलेली आहे. ह्या गोष्टी तुम्हांला पुढच्या उपासनेच्यावेळी शिकविता येतील. तसेच त्याविषयी प्रश्न विचारा.

## २) आगामी आठवड्यातील कार्यक्रमांची योजना आखा.

तुम्हांला व इतर विश्वासणूायांना आठवड्यामध्ये करता येतील अशा पर्यायी गोष्टीची यादी प्रत्येक अभ्यासक्रमात दिलेली आहे. सध्याच्या गरजा पूर्ण करणारे आणि स्थानिक परंपरांना अनुरूप असेच कार्यक्रम निवडा बाकीचे कार्यक्रम वगळा.

ह्या योजनांची घोषणा आणि स्पष्टीकरण उपासना सभेमध्ये करा. सर्व विश्वासणूायांना त्यांच्या विविध सेवाकार्याच्याद्वारे ख्रिस्ताची सेवा करण्याची संधी द्या.




उपासना सभेच्या वेळेतील तुमच्या शिक्षणातून हे कार्यक्रम करण्यासाठी विश्वासणूायांची तयारी झाली पाहिजे. समजा एखादा माणूस सिद्धांत प्रत्यक्ष आचरणात कसे आणायचे हे न सांगता फक्त त्यांसंबंधीची कर्तव्ये सांगतो तर तो देवाच्या वचनाचा गैरवापर करतो (याकोब 1:22; इफिस 2:8–10; 2 तीमथ्य 3:16–17).

विश्वासणारे पुढील आठवड्यात पुढील घटकांना आशीर्वाद देण्यासाठी काय करणार त्याची योजना अगोदरच सहकूायांबरोबर तयार करा:

- एकमेकांना (गलती 5:13)
- प्रत्येक कुटुंब (इफिस 5:21–33; 6:1–4)
- त्यांच्या आसपासचा समाज (मत्तय 5:13–14) आणि
- इतर मंडळ्या (प्रे. कृ. 15:41)

## ३) आगामी उपासना सभेची योजना आखा.

तुमच्या प्रशिक्षणार्थीच्या मंडळीतील प्रत्येकजण यात मुलेही आली, गट उपासनेमध्ये सहभागी होऊन

त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करून परस्परांची उन्नती करीत आहे याची खात्री करून घ्या. पौल तीमथ्य मुलांचा अभ्यास त्यांना पवित्र शास्त्रातील कथावृत्तांताचे नाट्यीकरण करणे स्तोत्रांमधील कविता व वचने पाठ म्हणणे आणि प्रश्न विचारणे याकरिता तयार करतात.

नवीन मेंढपाळाच्या कानात सैतान कुजबुजतो "तुझा गट अगदीच लहान आहे. त्यामुळे योजना वगैरे आखण्याची काहीच गरज नाही!" मेंढपाळ सर्वसमर्थ देवाच्या सान्निध्यात त्यांच्या मंडळीचे पुढारीपण करण्याची योग्य तयारी करण्यात अपयशी ठरतात तेव्हा त्यांच्या हातून पातक घडते.



**"तुझा गट अगदीच लहान आहे, त्यामुळे योजना वगैरे आखण्याची काहीच गरज नाही! हा हा हा!"**

पी. टी. एल. टी. अभ्यासक्रमात उपासना सभेच्या संबंधत अनेक कार्यक्रम दिलेले असतात तेव्हा त्यातील तुम्हांला आणि तुमच्या लोकांना आवश्यक असतील अशाच कार्यक्रमांची निवड करून बाकीचे बाजूला ठेवा.

**तुमच्या योजना लिहा**

तुमच्या प्रशिक्षणार्थींसाठी तुम्ही प्रथम कोणता अभ्यास निवडला आहे?

________________________________________

तुमच्या पुढील उपासना सभेसाठी तुम्ही कोणत्या योजना आखल्या आहेत?

________________________________________

________________________________________

तुमच्या प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या पुढील उपासना सभेसाठी कोणत्या योजना केल्या आहेत?

________________________________________

________________________________________


________________________________________

________________________________________

## मार्गदर्शकतत्व 10: **प्रशिक्षणार्थींनी विविध पद्धतींनी शिक्षण द्यावे याकरिता त्यांना साहाय्य करा**

येशू आणि त्याच्या शिष्यांनी अनेक प्रकारे शिक्षण दिले. कोणत्या ना कोणत्या प्रकारे सहभागी होण्याची विनंती पौल सर्वांना करतो. 1 करिंथ 14:26 हे वचन सांगते, "तुम्ही उपासनेकरिता एकत्र जमता तेव्हा तुमच्यापैंकी प्रत्येक जण कोणी स्तोत्र गाण्यास कोणी शिक्षण देण्यास कोणी प्रकटीकरण सांगण्यास, कोणी भाषेतून बोलण्यास तर कोणी तिचा अर्थ सांगण्यास तयार असतो..." अशा प्रकारच्या सक्रीय सहभागातून पवित्र आत्मा अधिक सामर्थ्याने कार्य करतो. पौल तीमथ्य अभ्यासक्रमात उपासना सभेसाठी निरनिराळ्या शैक्षणिक कार्यक्रमांचे वर्णन केलेले आहे.

बसण्यासाठी खुर्च्या वर्तुळाकार किंवा अर्धवर्तुळाकार पद्धतीने मांडा म्हणजे प्रत्येकाला एकमेकांचे चेहरे दिसतील.



तुम्ही लोकांना प्रश्नोत्तर रूपाने शिकविता आणि त्यांना मोकळेपणाने उत्तरांवर चर्चा करू देता तेव्हा ते त्यांच्या अधिक चांगल्याप्रकारे लक्षात राहते.

एक किंवा दोन प्रकारे प्रतिसाद द्या: "आता, अजून जे कोणी बोलले नाही त्यांचे म्हणणे आपण ऐकू या. प्रत्येकाने बोलावे आपले विचार मांडावेत, उदाहरणे द्यावीत किंवा प्रश्न विचारावेत अशी आमची इच्छा आहे."



लाजाळू लोकांना अडचणीत आणू नका. त्यांना शांत बसायचे असेल बोलायचे नसेल तर त्यांच्यावर दडपण आणू नका.

लहान गटांमध्ये नुसते व्याख्यान देऊन शिक्षण देणे टाळा. व्याख्यान देण्यासाठी अनुभवाची आवश्यकता असते आणि ते मोठ्या गटांसाठी उपयुक्त ठरते. नवीन मेंढपाळ विशेषत: ते तरुण असतात व्याख्यान देतात तेव्हा बरेचदा त्यांना गर्व वाटतो ते संतापतात, हेकेखोर होतात आणि मुर्खासारखे नियम करतात.

शास्त्रलेख शिकण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे पवित्र शास्त्र नाट्यमय पद्धतीने संवादात चढ उतार करून वाचणे. नवीन मेंढपाळांसाठीच्या ब्र्याचशा अभ्यासात आणि मुलांसाठीच्या सर्व अभ्यासात पवित्र शास्त्रातील किमान एक कथा वृत्तांत नाट्यमय पद्धतीने वाचण्यास किंवा अभिनय करण्यास दिलेला आहे.

इतरांना शक्य असल्यास त्यांना पवित्र शास्त्रातील कथावृत्तांतातील संवाद वाचण्यास अथवा अभिनीत करण्यास सांगा. उदाहरणार्थ निवेदक उधळ्या पुत्राचा कथावृत्तांत (लूक 15:11-32). त्यातील संवाद वगळता वाचून दाखवितो. वडील, धाकटा मुलगा थोरला मुलगा व सेवक ह्यांचे संवाद इतरांना म्हणू वाचू द्या.

लोकांनी छोटीशी नाटिका सादर करावी. पवित्र शास्त्रातील सत्ये नाट्यरूपाने समोर मांडली जातात तेव्हा त्यातून लोकांना अधिक चांगले शिकता येते. या नाट्यीकरणात ते स्वत: सहभागी झाले तर त्यांचे शिक्षण उत्तमच होते.

विविध प्रकारचे पोषाख आणि खूपशा तालमी कराव्या लागतील. अशा पद्धतीने नाट्यीकरण सादर करू नका. नाहीतर पवित्र शास्त्रातील सत्याकडे लक्ष वेधले जाण्याऐवजी अन्य गोष्टींकडेच लक्ष लागेल.

अभिनय करणारे प्रौढ किंवा मोठी मुले असतील तर अधिक चांगले कारण त्यांना संवाद तोंडपाठ करण्याची गरज नसते. काय बोलायचे याची सर्वसाधारण कल्पना त्यांना असली तरी पुरे होते. उदाहरणार्थ उधळ्या पुत्राच्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण करतांना निवेदक कथावृत्तांत वाचतो किंवा सारांशरूपाने सांगतो, आणि मग म्हणता "उधळ्या पुत्र काय म्हणतो ते ऐका." मग उधळ्या पुत्र त्याची भूमिका स्वत:च्या शब्दात वाचतो किंवा बोलतो धष्टपुष्ट वासराची भूमिका दोन मुलांना करता येईल. (ह्या दोन मुलांच्या पाठीवर ब्लँकेट टाका आणि त्यांना वासराचा आवाज काढत इकडे तिकडे फिरायला सांगा).

अत्यंत प्रभावशाली आणि नेहमी दिला जाणारा संदेश लक्षात घ्या. समुद्र किनाऱ्यावर लोकांना शिक्षण दिल्यावर येशू आपल्या बारा शिष्यांसमवेत वर डोंगरावर गेला तिथे पुलपिट नव्हते किंवा खुर्च्याही नव्हत्या. तो खाली जमिनीवर बसला आणि त्याने मोठ्या आपुलकीने जवळीक साधणारा संवाद साधला. हाच संवाद डोंगरावरील प्रवचन (मत्तय अध्याय 5-7) म्हणून प्रसिद्ध आहे.

## तुमच्या योजना लिहा

पुढच्या वेळी तुमचे लोक एकत्र जमतील तेव्हा त्यांना तुम्ही काय शिकवायचे ठरवले आहे?

---

---

विश्वासणायांना यात मुलेही आली, देवाचे वचन सादर करतांना सक्रीय सहभाग घेता यावा यासाठी पुढच्या उपासना सभेत तुम्ही कोणत्या पद्धतीने शिकवणार?

---

# मार्गदर्शकतत्व 11: **पवित्र शास्त्रानुसार नवीन मेंढपाळांवर कामगिरी सोपवा**



नवीन मेढपाळांवर पवित्र शास्त्रानुसार कामगिरी सोपविणे म्हणजे त्यांच्यावर हात ठेवून त्यांना देवाचे चिरंतन सामर्थ्य लाभावे याकरिता प्रार्थना करणे होय.

ते वडील जनांप्रमाणे असावे. त्यांनी 1 तीमथ्य 3:1–7 ह्या वचनांत सांगितलेल्या बाबी पूर्ण केलेल्या असाव्यात. यात ख्रिस्ताकडे नव्याने आलेल्यांचा समावेश नाही. त्यांनी कायमस्वरूपी देखभाल करणारे मेंढपाळ वडील म्हणून काम सोपवण्यापूर्वी स्वत:ला सिद्ध केले पाहिजे.



काही मंडळ्यांमध्ये बायबल कॉलेजमध्ये जाऊन ईश्वरपरिज्ञानाचे शिक्षण घलेल्या तरुणांची मेंढपाळ म्हणून नेमणूक केली जाते, परंतु शास्त्रलेखानुसार आवश्यक बाबी त्यांनी सिद्ध केलेल्या नसतात. तसेच त्यांना समाजात आदरही नसतो

मनुष्य मानव निर्मित गोष्टी नवीन पुढ्यायांसाठी लागू करतो किंवा पवित्र शास्त्रातील आवश्यक बाबी आचरणात आणण्यात अपयशी ठरतो तेव्हा वाईट परिणाम समोर येतात. ह्या दोन्ही चुका देवाच्या लोकांसाठी आपत्तीजनकच ठरतात.

नवीन पुढ्यायांवर औपचारिकपणे काम सोपविण्यासाठी त्यांच्या वर हात ठेवावेत याकरिता ते पवित्र शास्त्रानुसार आवश्यक बाबींची पूर्तता करीत नसले तरी त्यांना प्रशिक्षण द्या, कारण काही तरी प्रशिक्षण दिल्याशिवाय त्यांना ह्या बाबींची पूर्तता कधीच करता येणार नाही. अत्यंत अनुभवी अशा पुढ्यायाच्या देखरेखी खाली असे प्रशिक्षण घेणारे मेंढपाळ त्यांच्या कुटुंबियांची आणि शोधकांच्या लहान गटांची किंवा त्यांच्या नव्या मंडळ्यांतील नवीन विश्वासणाऱ्यांची देखभाल करतील. अशा अद्याप अपात्र असणाऱ्या लोकांना औपचारिकपणे अधिकृत वडील म्हणून मान्यता न देता त्यांनी हंगामी, तात्पुरते मेंढपाळ म्हणून केवळ सेवा करावी.

### तुमच्या योजना लिहा

तुम्ही प्रशिक्षण देत असलेल्या प्रशिक्षणार्थीपैकी औपचारिकपणे कामगिरी स्वीकारण्यास कोण तयार आहे?

___

___

___

___

___

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net